“भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार” योजनेची व्याप्ती वाढविणेबबात.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः आविवि-२०१८/प्र.क्र.७५/कार्यासन-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा : १) शासन निर्णय ,आ.वि.वि. क्रमांक: आविवि-२०१५/प्र.क्र.७८/का-१६, दि.१८ नोव्हेंबर,२०१५
२) शासन निर्णय, आ.वि.वि. क्रमांक : आविवि-२०१६/प्र.क्र.६६/का-८, दि. ०२ ऑगस्ट, २०१६
३) शासन निर्णय, आ.वि.वि. क्रमांक : आविवि-२०१६/प्र.क्र.६६/का-८, दि. ०५ ऑगस्ट, २०१६
४) शासन परिपत्रक, वि.वि. क्रमांक: अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१२ जानेवारी, २०१६
५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बाल कल्याण), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे क्र.एबाविसेयो/वि.अ.(सां.)/२०१८-१९/८९ दि.२१.०१.२०१९ रोजीचे पत्र.
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बेलापूर, नवी मुंबई यांचे क्र.एबाविसेयो/प्रशिक्षण/२०१८-१९/४०० दि.२८.०१.२०१९ रोजीचे पत्र.
७)मा.सचिव, आ.वि.वि. यांनी दि.२४.०५.२०१७ रोजी घेतलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे घेतलेल्या “डॉअमृत आहार योजना अब्दुल कलाम.जे.पी.ए.” आढावा बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना:-

अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठी “भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना” ही शासनाने सुरू केलेली अत्यंत महत्वाची पथदर्शी योजना आहे. ही योजना संदर्भाधीन दि.१८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये दि.१ डिसेंबर, २०१५ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना पहिले सहा महिने एक वेळ आहार देण्याचा निर्णय दि.२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

मा.सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी दि.२४.०५.२०१७ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे घेतलेल्या “डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना” आढावा बैठकीमध्ये ज्या अंगणवाड्या सदर योजनेपासून वंचित आहेत त्या अंगणवाड्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच माडा व मिनी माडा क्षेत्रांना या योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यासाठी संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना प्रस्ताव सादर करून सदर एकत्रित प्रस्ताव आयुक्तालयाने शासनास सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार माडा व मिनी माडा क्षेत्रांना या योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यासाठी संबंधित सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तसा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(बाल कल्याण) जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी अनुसूचित क्षेत्रातील ३६ एकात्मिक बाल विकास प्रकल्प (ICDS) अंतर्गत न येणाऱ्या परंतू अनुसूचित क्षेत्राअंतर्गत (TSP) येणाऱ्या गावांच्या अंगणवाडी मध्ये “डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना” राबविण्यासंबंधीचा दि.२१.०१.२०१८ रोजीचा प्रस्ताव आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बेलापूर, नवी मंबई यांच्या मार्फत शासनास सादर केला आहे . सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अनुसूचित क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या परंतु यापूर्वी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत समाविष्ट नसलेल्या गावांना सदर योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने ही गावे सदर योजनेअंतर्गत सामाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

१. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार गडचिरोली जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या परंतु या पूर्वी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत समाविष्ट नसलेल्या गावांचा सामावेश सदर योजनेअंतर्गत करण्यात येऊन गावातील अंगणवाड्यांना या योजनेचा लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सोबत जोडलेल्या यादीतील अंगणवाडी केंद्रांमध्ये सदर योजना राबविण्यात यावी. या योजनेअंतर्गत अनुसूचित क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या अंगणवाडीकरिता चार सदस्यीय आहार समिती स्थापन करावी व संयुक्त बँक खाते सुरू करावे. सदर बँक खात्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली यांना कळवावी.

२. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बेलापूर, नवी मुंबई यांनी संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण यांना निधी उपलब्ध करून द्यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२८१२११२०९५२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: CN = Laxmikant Gopalrao Dhoke, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Tribal Development Department
Date: 2019.02.28 12:29:43 +05'30'

(ल. गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.

६) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
७) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९) सर्व मा. संसद सदस्य.
१०) सर्व मा. विधानसभा /विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ.
११) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
१८) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग,मंत्रालय, मुंबई
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,पुणे
२२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक .
२३) महासंचालक, राजमाता जिजाऊ पोषण मिशन, नवी मुबंई.
२४) आयुक्त, कुटुंब कल्याण,मंत्रालय, मुंबई.
२५) संचालक, सार्वजनिक आरोग्य संचालनालय,मुंबई.
२६) सर्व विभागीय आयुक्त
२७) सर्व जिल्हाधिकारी
२८) युनिसेफ राज्यप्रमुख, मुंबई.
२९) स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी
३०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (अनुसूचित क्षेत्र/सर्व आदिवासी जिल्हे)
३१) सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
३२) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
३३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प (१६ जिल्हे)
३४) सह संचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई.
३५) सह संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३६) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.
३७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण, जिल्हा परिषद.
३८) जिल्हा कोषागार अधिकारी (संबंधित जिल्हे)
३९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
४०) महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
४१) वित्त विभाग (व्यय -१४), मंत्रालय, मुंबई -३२
४२) सर्व सहसचिव /उपसचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
४३) निवड नस्ती -कार्यासन (८)

****

भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील समाविष्ट गावं/आंगणवाडी केंद्र

अ.क्र.	प्रकल्प	बिट	अंगणवाडी केंद्र	अंगणवाडी कोड क्रमांक	एकुण लोकसंख्या	अनुसूचित जमातीची एकुण लोकसंख्या	अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी	Main/Mini AWC
१	आरमोरी	विहीरगांव	बाजीराव टोला	२७५०८०२०५०१	२१२	२१२	१००	Main AWC
२	आरमोरी	विहीरगांव	चिचटोला	२७५०८०२०५०५	९६	९६	१००	Mini AWC
३	आरमोरी	विहीरगांव	खैरटोला	२७५०८०२०५१०	१२४	११६	९४	Mini AWC
४	आरमोरी	विहीरगांव	कोसमटोला	२७५०८०२०५१३	२३७	२३७	१००	Main AWC
५	आरमोरी	विहीरगांव	माझीटोला	२७५०८०२०५१६	९७	९७	१००	Mini AWC
६	आरमोरी	विहीरगांव	पाटीलटोला	२७५०८०२०५२४	१५६	१५६	१००	Main AWC
७	आरमोरी	विहीरगांव	पिपरटोला	२७५०८०२०५२५	३४१	३१३	९२	Main AWC
८	आरमोरी	विहीरगांव	सलंगटोला	२७५०८०२०५२९	२८७	२५०	८७	Main AWC
९	आरमोरी	विहीरगांव	शिवटोला	२७५०८०२०५३०	५१	५१	१००	Mini AWC
१०	आरमोरी	विहीरगांव	ताडामटोला	२७५०८०२०५३१	१११	१११	१००	Mini AWC
११	आरमोरी	विहीरगांव	टेकामटोला	२७५०८०२०५३२	१७०	१७०	१००	Main AWC
१२	आरमोरी	विहीरगांव	झेडेपार	२७५०८०२०५३८	६४	६४	१००	Mini AWC
१३	चामोर्शी	आमगावं	पदाटोला	२७५०८०४०१२४	१८२	१८२	१००	Mini AWC
१४	चामोर्शी	घोट	माडेमुधोली टोला	२७५०८०४०६१३	८५	८५	१००	Mini AWC
१५	चामोर्शी	घोट	शांतीनगर	२७५०८०४०६२०	३६०	२९४	८२	Main AWC
१६	चामोर्शी	कोनसरी	धर्मपूर	२७५०८०४०८०२	८२५	८००	९७	Main AWC
१७	चामोर्शी	कोनसरी	धर्मपूरटोली	२७५०८०४०८०३				Mini AWC
१८	चामोर्शी	कुनघाडा	संलंगटोला	२७५०८०४०७३०	४९	४९	१००	Mini AWC

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: CN = Laxmikant Gopalrao Dhoke, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Tribal Development Department
Date: 2019.02.28 12:30:03 +05'30'

(ल.गो.ढोके)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

१९	चामोर्शी	लखमानापूर बोरी	मुरखळाचक १	२७५०८०४०९१२	१०३१	६३२	६१	Main AWC
२०	चामोर्शी	लखमानापूर बोरी	मुरखळाचक २	२७५०८०४०९१३				Main AWC
२१	चामोर्शी	लखमानापूर बोरी	वागदरा	२७५०८०४०९१८				Main AWC
२२	चामोर्शी	रेगडी	गांधी नगर	२७५०८०४१००६	४१८	२९६	७१	Main AWC
२३	चामोर्शी	रेगडी	कोळसेगट्ठा	२७५०८०४१००९	२९८	२७५	९२	Main AWC
२४	चामोर्शी	रेगडी	रेगडी १	२७५०८०४१०२२	२०७२	१५१७	७३	Main AWC
२५	चामोर्शी	रेगडी	रेगडी २	२७५०८०४१०२३				Main AWC
२६	चामोर्शी	रेगडी	रेगडी ३	२७५०८०४१०२४				Main AWC
२७	चामोर्शी	रेगडी	रेगडी टोला १	२७५०८०४१०२५				Main AWC
२८	चामोर्शी	रेगडी	रेगडी टोला २	२७५०८०४१०२६				Mini AWC
२९	चामोर्शी	रेगडी	वेगनूर	२७५०८०४१०२७	७५२	५१८	६९	Main AWC
३०	चामोर्शी	तळोधी	कळमगांव	२७५०८०४११०८	६६३	४२२	६४	Mini AWC
३१	चामोर्शी	तळोधी	लेनगुडा	२७५०८०४१११२	८२	८२	१००	Mini AWC
३२	चामोर्शी	तळोधी	सोमनपल्ली	२७५०८०४११२३	६९	६९	१००	Mini AWC
३३	चामोर्शी	येनापूर	प्रियदर्शनी	२७५०८०४१२१९	३८५	३३२	८६	Main AWC
३४	चामोर्शी	येनापूर	राजगोपालपूर	२७५०८०४१२२०	६०१	४२८	७१	Main AWC
३५	चामोर्शी	येनापूर	रश्मीपूर	२७५०८०४१२२३	५४१	४९१	९१	Main AWC
३६	चामोर्शी	येनापूर	रश्मीपूर टोला	२७५०८०४१२२४				Mini AWC

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: CN = Laxmikant Gopalrao Dhoke, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Tribal Development Department
Date: 2019.02.28 12:30:24 +05'30'

(ल.गो.ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन